किंमत - वार्षिक वर्गणी २००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३ ● प्रश्नचिन्ह

५ ● दोन महासत्ता, दोन पवित्रे, दोन व्यूहरचना...

१५ ● कसे असेल चालू वर्षातील अर्थचित्र...! (?)

१९ ● पदवी आहे पण कौशल्यांचे काय...?


**खंड १६ : अंक १०** **जानेवारी २०१८**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

वार्षिक वर्गणी २००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**
**खंड १६ (अंक १०) जानेवारी २०१८**
**संपादक - अभय टिळक**

### *'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- ●उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- ●अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- ●निःपक्ष व साधार
- ●सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

### *अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- ●मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- ●निवडक साहित्याचे संकलन
- ●संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- ●संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

●या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

●अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# प्रश्नचिन्ह

'अर्थबोधपत्रिके'च्या कुटुंबातील सगळ्यांना नवीन वर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. कॅलेंडरच्या उलटत्या पानाबरोबर आपल्या सर्वांच्या जीवनात नव्यानेच प्रवेशलेले २०१८ हे वर्ष शांतीचे, आनंदाचे, सुखसमाधानाचे आणि उत्तम आरोग्याचे ठरो, हीच मनोकामना.

अवतरलेले हे नवीन वर्ष नवीन प्रश्न आणि नवीन आव्हाने आपल्या पुढ्यात मांडणार आहे, याची चुणूक २०१७ या वर्षाच्या सरत्या पर्वातच दिसून आली. येत्या काळात आपल्या देशाचे आर्थिक, व्यापारी तसेच सामरिक धोरण सर्वसाधारणपणे कसे राहील याचा ढोबळ आराखडा चीन आणि अमेरिका या दोन महासत्तांनी, २०१७ हे वर्ष निरोपाच्या सत्रात प्रवेशत असतानाच, जागतिक समुदायाच्या पुढ्यात मांडला. या दोन बलाढ्य अर्थसत्तांमधील मांडवलीद्वारे जागतिक स्तरावरील अर्थचित्राचा तपशील साधारणपणे १९८०च्या दशकापासूनच सिद्ध होत राहिला. २००८ सालातील सप्टेंबर महिन्याच्या मध्याला अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये घडून आलेल्या 'सबप्राइम क्रायसिस' नावाच्या भूकंपाचा केंद्रबिंदूही चीन आणि अमेरिका यांच्यादरम्यानच्या व्यापारी संगनमतामध्येच दडलेला होता. १५ सप्टेंबर २००८ रोजी लेहमन ब्रदर्सने जाहीर केलेल्या दिवाळखोरीमधून निपजलेल्या आर्थिक अरिष्टाच्या दणक्यातून जागतिक अर्थव्यवस्था आता पुरेपूर दशकभरानंतर आता कोठेशी अंमळ स्थिरावते आहे. नेमक्या याच बिंदूवर, आता, अमेरिका आणि चीन या दोन महासत्तांनी, येऊ घातलेल्या काळादरम्यानची त्यांची राजकीय भूमिका स्पष्ट केलेली असल्याने जागतिक समुदायाच्या पोटात भीतीचा गोळा नव्याने उद्भवावा, अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प हे त्यांच्या आर्थिक राष्ट्रवादाचा झेंडा उंच फडकवण्याच्या प्रेरणेने झपाटलेले आहेत. तर, जागतिकीकरणाद्वारे आजवर एकमेकांत गुंफण होत आलेल्या आजच्या जगात कोणाही एका देशाने आर्थिकबाबतींत आत्ममग्न पवित्रा स्वीकारला तर ते सगळ्या जागतिक अर्थकारणालाच महागात पडेल, असा इशारा चीनचे सर्वेसर्वा शि जिनपिंग यांनी स्पष्ट शब्दांत मुखर केला आहे.



या दोन महासत्तांचे पवित्रे येत्या काळात नेमके कसे राहतील त्यांवर जागतिक राजकारणाचा आणि पर्यायाने अर्थकारणाचाही चेहरामोहरा अवलंबून राहील. या सगळ्याचे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये काय पडसाद उमटतात ते बघणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्याला कारणही तसेच आहे. राजकारण आणि अर्थकारण यांच्या दरम्यानचे नाते आपल्या देशात येत्या काळात एका नवीनच पर्वातून पुढे सरकेल याचे स्पष्ट संकेत गुजरातमधील निकालाने दिलेले आहेत. भारतीय जनता पक्षाच्याबाबतीत २००४ साली उद्भवलेला पेच पुन्हा जवळपास त्याच स्वरूपात दीड दशकानंतर, म्हणजे, २०१९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीदरम्यान पुढ्यात पुन्हा एकवार उभा ठाकेल, असे स्वच्छ दिसते. 'इंडिया' आणि 'भारत' (का, इंडिया की भारत ?) या द्वंद्वावर भारतीय जनता पक्ष किंवा काँग्रेस या दोन्ही मुख्य व मोठ्या राष्ट्रीय पक्षांपाशी काहीही ठोस उत्तर असल्याचे निदान आजमितीला जाणवत तरी नाही. *(कृपया पृष्ठ २९ पाहावे)*

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सामाजिक**

# दोन महासत्ता, दोन पवित्रे, दोन व्यूहरचना...

अमेरिका आणि चीन या आजच्या जगातील दोन महासत्तांच्या सर्वोच्च सत्ताधीशांनी अगदी अलीकडेच लक्षवेधी वक्तव्ये केली. समाजमाध्यमांनी त्यांची फारशी दखल न घेतल्यामुळे त्या वक्तव्यांच्या तपशीलाबाबत कोठेच म्हणावा असा उहापोह झाला नाही. पण म्हणून, अगदी अनुल्लेखाने मारावीत अशी आणि इतकी ती दोन वक्तव्ये नगण्य अथवा क्षुल्लकही नक्कीच नाहीत. कारण, येत्या काळातील अर्थकारणाबाबत आपल्या सरकारचे धोरण काय असेल त्याचे सूचन ट्रम्प आणि जिनपिंग या दोन सत्ताधीशांनी त्या वक्तव्यांद्वारे जागतिक समुदायाला घडवलेले आहे. एका परीने, येत्या काळातील आर्थिक वाटचालीबाबत आपापली व्यूहरचना नेमकी कशी असेल, याचा आराखडाच जणू या दोन राष्ट्रप्रमुखांनी मांडलेला आहे. राजकीय वृत्तिप्रवृत्तींचा अत्यंत प्रगाढ प्रभाव अर्थविषयक धोरणांवर पडत असतो. ट्रम्प आणि जिनपिंग या दोघांनी त्यांच्या वक्तव्यांद्वारे त्यांच्या शासनकाळात अर्थविषयक राजकीय धोरणांचा कल काय असेल, यांकडेही पुरेसा बोलका व स्वच्छ निर्देश केलेला आहे. त्यांमुळे, केवळ या दोन महासत्तांच्याच नव्हे तर, सगळ्या जगाच्या राजकारणाचा आणि अर्थव्यवहारांचा येत्या काळातील चेहरामोहरा ठरवणा-या या वक्तव्यांचा अर्थ व आशय जाणून घेणे उद्बोधकच केवळ नव्हे तर आवश्यक ठरावे.

दोन महासत्तांच्या दोन सत्ताधीशांच्या या दोन वक्तव्यांचा कालक्रमही मजेदार आणि अर्थपूर्ण आहे. चिनी कम्युनिस्ट पक्षाच्या १९व्या अधिवेशनाला संबोधित करताना शि जिनपिंग यांनी बीजिंग येथे १८ ऑक्टोबर २०१७ रोजी केलेल्या भाषणादरम्यान चीनच्या भविष्यकालीन वाटचालीचा रोख स्पष्ट केला. तर, त्या नंतर बरोबर दोन महिन्यांनी, म्हणजे, १८ डिसेंबर २०१७ या दिवशी अमेरिकेची राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचना शब्दांकित करणारा दस्तऐवज प्रकाशित झाला. येत्या काळात अमेरिकी सुरक्षेबाबतचे ट्रम्प यांचे विचार त्यांत प्रगट झालेले आहेत.



दोन महासत्तांच्या या दोन अध्यक्षांनी आपापल्या देशाच्या भविष्यकालीन चित्राबाबतचा मनोदय व्यक्त करण्यासाठी निवडलेली व्यासपीठेदेखील सूचक व म्हणूनच खूप काही सांगून जाणारी आहेत. दर पाच वर्षांनी भरणारे चिनी कम्युनिस्ट पक्षाचे अधिवेशन हा एक मोठा राजकीय शक्तिप्रदर्शन सोहळा असतो. चीनच्या सर्वोच्च नेतृत्वाची निवड करणे हा या अधिवेशनाच्या कार्यक्रमपत्रिकेवरील मुख्य मुद्दा असतो. तसेच, नेतृत्त्वाने मांडलेल्या नवीन धोरणांवर मान्यतेची मोहोर उमटविण्याचे महत्त्वाचे कामदेखील या अधिवेशनादरम्यानच पूर्ण होते. ट्रम्प महाशयांनी अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे गेल्या वर्षीच्या प्रारंभी हाती घेतल्यानंतर चीनबरोबर अमेरिकेचे संबंध येत्या काळात नेमके कसे राहतील यांबाबत उलटसुलट चित्रच जागतिक समुदायाच्या पुढ्यात वारंवार उमटत राहिले. ट्रम्प ज्याचा सदोदित उल्लेख करत असतात त्या ‘अमेरिका फर्स्ट’ या त्यांच्या धोरणझोतापायी चीन आणि अमेरिका या दोन महासत्तांदरम्यानच्या व्यापारासंदर्भात आजवर अवलंबले गेलेले धोरण भविष्यातही कायम राहील का, यांबाबत सगळ्यांनाच उत्सुकता आहे. ‘अमेरिका फर्स्ट’ या भूमिकेद्वारे निर्देशित होणा-या आर्थिक राष्ट्रवादपूरक मानसिकतेमुळे अमेरिका इथून पुढे खुल्या व्यापाराबाबत कोणते धोरण अवलंबते यांबाबत कोणालाही आज स्पष्टता नाही.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, चिनी नेतृत्त्वाचे भविष्यकाळाबाबतचे चिंतन कसे आहे, याची उत्सुकता सगळ्यांनाच होती. जिनपिंग यांचे अध्यक्षीय वक्तव्य त्यांमुळेच कुतूहलाचा विषय बनलेला होता. येत्या तीन दशकांदरम्यान चीनला जगातील आघाडीवरील एक सत्ता बनवण्याचे ध्येय जिनपिंग यांनी त्यांच्या भाषणाद्वारे चिनी जनतेसमोर आणि पर्यायाने वैश्विक समुदायाच्या पुढ्यात मांडले. चीनचे राजकीय, आर्थिक आणि सामरिक धोरण येत्या काळात कसे असेल याचा आराखडा मांडत असतानाच त्यांनी, अतिशय सूक्ष्म धोरणीपणाने, जागतिक व्यापारासंदर्भातील अमेरिकेच्या बदलत्या संभाव्य भूमिकेचाही समाचार घेतला. गंमत म्हणजे, त्या नंतर बरोबर दोनच महिन्यांनी ट्रम्प यांनी सादर केलेल्या अमेरिकी सुरक्षा व्यूहरचनाविषयक अहवालात जिनपिंग यांना उत्तर दिलेले दिसते.

**चीनच्या भविष्यकालीन जडणघडणीचे पंचशील**

जागतिक सत्तापटलावरील आघाडीची एक सत्ता म्हणून २०५० सालापर्यंत चीनची ओळख प्रस्थापित करण्याचा मानस व्यक्त करताना जिनपिंग यांनी त्यासाठी मांडलेली पंचसूत्रे मोठी चिंतनीय आहेत. बहुकेंद्री सत्तातोलातील एक आघाडीचा भिडू म्हणून चीनची जडणघडण करण्याचे पंचशीलच जणू जिनपिंग यांनी १९व्या अधिवेशनाच्या व्यासपीठावरू न मांडले. ती पंचसूत्रे नीट वाचली की त्यांतील कणखर व आक्रमक अंतःस्वर स्पष्टपणे जाणवतो.

देशादेशांदरम्यानच्या सहकार्यावर चीनचा भर असेल, हे त्या पंचशीलातील पहिले सूत्र. परंतु, त्याच वेळी जागतिक दर्जाचे आणि युद्धे जिंकण्याची क्षमता अंगी बाळगणारे लष्कर निर्माण करण्यावर चीनचा भर येत्या काळात राहील, हेही तिथेच स्पष्ट करण्यात आलेले आहे. म्हणजेच, स्वतःची प्रहारक्षमता बुलंद बनवलेला चीन अन्य देशांबरोबर सहकार्याचे धोरण भविष्यात राबवेल, हे जिनपिंग स्वच्छ सांगून टाकतात. देशादेशांदरम्यान सहकार्य नांदावे यावर चीनचा भर राहणार असला तरी, स्वायत्ततेची अपेक्षा धरणा-या तैवान, हाँगकाँग यांसारख्या प्रांतांबाबत चिनी शासकांची भूमिका कठोरच राहील, हेही जिनपिंग यांनी निःसंदिग्धपणे सांगून टाकले. म्हणजेच, स्वतःच्या अधिपत्याखालील एक इंच भूमीबाबतही चीन तडजोड करणार नाही, हे स्पष्टच होते. येऊ घातलेल्या नव्या युगासाठी खास चिनी मुशीतून घडवलेला समाजवाद प्रवर्तित करण्याचा निर्धारही जिनपिंग यांनी व्यक्त केला. अन्य देशांतील राजकीय व्यवस्थेची नक्कल चीन करणार नाही, असे निःसंदिग्ध संकेत त्यांनी दिले. म्हणजेच, लोकशाही राजकीय प्रणालीचा अंगीकार चीन करणार नाही, हे पुरेपूर उमगते. येत्या काळातील आर्थिक आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्याच्या दृष्टीने चीनला नवसर्जकांचे नंदनवन बनवण्याचा निर्धार जिनपिंग यांनी मुखर केला. चीनमधील वित्तीय व्यवस्था आणि विनिमय दर या दोहोंत बाजारपेठेची भूमिका येत्या काळात वाढवली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आणि हे सगळे साधत असतानाच पर्यावरण संवर्धनावरही चिनी विकासधोरणांचा भर राहेल, असे ऐलान जिनपिंग यांनी केले.



अर्थात, जिनपिंग यांच्या या कथनातील किती बाबी व्यवहारात उतरतात हे आताच सांगणे अवघड आहे. परंतु, यातून दोन बाबी पुरेशा स्पष्ट होतात. 'सब्प्राइम क्रायसिस'नंतर बदललेल्या जागतिक सत्तापटलावरील एक आघाडीचा मोहरा म्हणून भूमिका बजावण्यास चीन येत्या काळात अधिक आक्रमकपणे प्रयत्नशील राहील, ही झाली पहिली बाब. चीनचा आजवरचा उदय हा मुख्यतः दमदार आर्थिक आगेकूचीच्या बळावरच झालेला आहे. चिनी आर्थिक विकासाच्या होडीची शिडे अमेरिकी बाजारपेठेतील मागणीचा वारा भरल्यामुळे तटतटून फुगलेली होती. आता, २००८ साली उद्भवलेल्या मंदीनंतर अमेरिकी बाजारपेठांतील मरगळलेली मागणी ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट'च्या भूमिकेमुळे अधिकच कोमेजली तर चिनी अर्थव्यवस्थेला पर्यायी विकासधोरणाची कास धरण्यावाचून पर्यायच राहणार नाही. त्यांचमुळे, देशादेशांदरम्यानच्या सहकार्यावर भर देण्याचा मुद्दा जिनपिंग यांच्या नवीन पंचशीलात पहिल्या स्थानावर दिसतो. मुळात, चीनने आजवर अवलंबलेल्या निर्यातप्रधान अर्थविकासधोरणाला 'सबप्राइम क्रायसिस'नंतर वाईट दिवस आल्याने देशी बाजारपेठेचा विकास करण्यावर भर देणारी आर्थिक विकासाची अंतर्मुख धोरणे चीन अलीकडे राबवायला लागलेला आहे. परंतु, १९७८-७९ सालापासून चीन राबवत आलेल्या आर्थिक विकासाच्या धोरणांद्वारे जे अंतर्विरोध चिनी अर्थव्यवस्थेत निर्माण झालेले आहेत ते ध्यानात घेता, गेली ४० वर्षे अवलंबलेले निर्यातप्रधान असे बहिर्मुख विकासधोरण १८० अंशांतून वळवून एकदम अंतर्मुख बनवणे ही सोपी बाब नसल्याचे चिनी धोरणकर्त्यांना उमगले असावे, याचा अदमास जिनपिंग यांच्या वक्तव्यावरू न येतो. देशादेशांदरम्यान सहकार्यावर भर देण्याच्या मुद्याला त्यांनी अग्रक्रम द्यावा, ही वस्तुस्थिती या सगळ्या पार्श्वभूमीवर लक्षणीय ठरते. तसेच, चिनी वित्तीय व्यवस्था आणि विनिमय दराच्या निश्चितीसंदर्भात खुल्या बाजारपेठीय प्रवाहांना व प्रणालीला अधिक वाव देण्याबाबत सुतोवाच जिनपिंग यांनी केलेले असले तरी, लोकशाही राज्यपद्धतीचा अंगीकार चीन करणार नसल्याचे त्यांनी तिथेच सांगून टाकले, ही बाबही चीनमधील अंतर्गत विरोधाभासांमुळे तिथे सुप्तपणे खदखदणा-या सामाजिक असंतोषांकडे अंगुलीनिर्देश करणारी अशीच आहे.

## अमेरिकी राष्ट्रीय सुरक्षेची चतुःसूत्री

शि जिनपिंग यांनी केलेल्या या भाषणानंतर बरोबर दोन महिन्यांनी अमेरिकेने तिच्या राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचनेचा आराखडा शब्दबद्ध असलेला दस्तऐवज प्रकाशित केला. १८ डिसेंबर २०१७ रोजी जाहीर झालेल्या या मसुद्यात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डॉनल्ड ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसंदर्भातील त्यांची चतुःसूत्री प्रगट केलेली आहे. अमेरिकेची सुरक्षा व्यवस्था आणि सुरक्षा व्यवस्थेशी संलग्न विविध बाबींशी निगडित असलेल्या यंत्रणांच्या पुनर्रचनेचा एक भाग म्हणून अशा प्रकारचा एक दस्तऐवज तयार करण्यात यावा, अशी कायदेशीर तरतूद तिथे १९८६ साली करण्यात आली. तिला अनुसरू नच राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचनेचा दस्तऐवज प्रत्येक अमेरिकी राष्ट्राध्यक्ष तयार करून घेतो आणि तो अमेरिकी काँग्रेसला सादर केला जातो.

अमेरिकी सुरक्षा व्यूहरचना दस्तऐवजामध्ये तीन बाबींचा उहापोह करण्यात येतो. अमेरिकेचे जगभरातील हितसंबंध, त्या संदर्भातील अमेरिकेची उद्दिष्टे व ध्येये यांचे विवरण सादर करणे, हा झाला त्यांतील पहिला भाग. त्या हितसंबंधांच्या संपादणूक व जोपासनेसाठी करावयाच्या अल्पकालीक आणि दीर्घकालीन आर्थिक, राजकीय तसेच लष्करी उपयोजनाचा आराखडा विशद करणे, हा असतो या दस्तऐवजातील दुसरा भाग. तर, निर्माण करण्यात आलेल्या राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचनेच्या अंमलबजावणीसाठी कार्यान्वित करावयाच्या सक्षमतेची व सिद्धतेची चाचपणी करणे, हा राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचना दस्तऐवजाचा असतो तिसरा घटक.

ट्रम्प यांनी मांडलेल्या अमेरिकी राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचना अहवालामध्ये शि जिनपिंग यांनी १८ ऑक्टोबर २०१७ रोजी केलेल्या भाषणाचे व्यक्ताव्यक्त पडसाद जाणवतात. आजचे जग अधिक स्पर्धात्मक बनलेले असल्याचा तक्रारयुक्त स्वर ट्रम्प यांच्या विवेचनात दिसतो. चीन, रशिया, कोरिया, इराण यांसारखे देश जगातील राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक आघाड्यांवर अस्वस्थता निर्माण करत असल्याचे प्रतिपादन ट्रम्प करतात. विशेषतः चीनसारखे देश एकंदर वैश्विक अर्थकारणच अन्याय्य बनवत असल्याची ट्रम्प यांची जोरकस तक्रार त्या अहवालात व्यक्त झालेली आहे.



अमेरिकेच्या हिताचे संगोपन-संवर्धन घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचना अहवालात चार सूत्रे निर्देशित केलेली आहेत. अमेरिकी भूमी आणि अमेरिकी नागरिकांचे रक्षण करणे, हे त्या चतुःसूत्रीमधील आद्य सूत्र होय. रोजीरोटीसाठी अमेरिकी भूमीकडे धाव घेण्याच्या जगभरातील प्रवृत्तीकडे या पहिल्या सूत्रामध्ये निर्देश केलेला सापडतो. अन्य देशांतील नागरिकांना अमेरिकेमध्ये प्रवेश देण्यासंदर्भातील तसेच बाहेरून अमेरिकेमध्ये आलेल्यांना अमेरिकी अर्थव्यवस्थेत नोक-या मिळण्यासंदर्भातील धोरणाचा पुनर्आढावा घेण्याचा ट्रम्प यांचा मानस या पहिल्या सूत्रामध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे. चतुःसूत्रीमधील दुसरा मुद्दा आहे तो अमेरिकी सुबत्तेचे संवर्धन घडवण्याबाबतचा. समृद्ध अमेरिकेच्या पायावरच सुरक्षित अमेरिकेची उभारणी शक्य आहे, असे तर्कशास्त्र या दुस-या सूत्राच्या मुळाशी मांडण्यात आलेले जाणवते. अमेरिकी कामगार आणि अमेरिकी उद्योग व कंपन्या यांच्या व्यावसायिक हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी अमेरिकी अर्थव्यवस्थेला चालना देण्याची निकड इथे व्यक्त करण्यात आलेली आहे. ट्रम्प मांडत असलेल्या आर्थिक राष्ट्रवादाच्या मुद्याचा संदर्भ या सूत्रामध्ये प्रतिध्वनित होतो. अमेरिकी प्रभावक्षेत्राच्या कक्षा वाढवण्यावर भविष्यात राहणारा राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचनेचा भर चतुःसूत्रीमधील तिस-या सूत्रात स्पष्ट करण्यात आलेला आहे. तर, एकंदरच आर्थिक विकासासाठी अनिवार्य असलेल्या शांतीच्या संवर्धनासाठी बलसंवर्धन आवश्यक असल्याचे सूचक विधान चतुःसूत्रीमधील चौथ्या सूत्रात केलेले दिसते.

अमेरिकेच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी आर्थिक सुबत्ता अनिवार्य आहे; किंबहुना, आर्थिक सुबत्ता हीच राष्ट्रीय सुरक्षेची पूर्वअट ठरते, ही जाणीव सुरक्षा व्यूहरचनेच्या दस्तऐवजात तपशीलवार मांडण्यात आलेली आहे. अशी सुबत्ता साध्य करण्यासाठी अमेरिकी अर्थव्यवस्थेचे वेगवान आणि दमदार पुनरु त्थान अनिवार्य ठरते, असे प्रतिपादन हा दस्तऐवज करतो. हे पुनरु त्थान साध्य करण्यासाठी अमेरिका कोणत्या प्रकारची आर्थिक धोरणे राबवते, हे बघणे महत्त्वाचे ठरते. कारण, त्या आर्थिक धोरणांच्या तपशीलावर केवळ अमेरिकी अर्थव्यवस्थेचाच नव्हे तर वैश्विक अर्थकारणाचाही भविष्यकालीन चेहरामोहरा निर्भर राहणार आहे.

## कमकुवत दुव्यांचा लेखाजोखा

अमेरिकी अर्थव्यवस्थेपुढील आव्हाने आणि अमेरिकी अर्थव्यवस्थेतील कमकुवत दुवे यांची बारकाईने चिकित्सा करणारा या दस्तऐवजातील अंश मननीय ठरतो. त्याची कारणे दोन. एक म्हणजे, अमेरिकी अर्थव्यवस्थेतील ज्या कमकुवत दुव्यांचे विवेचन या अहवालामध्ये करण्यात आलेले आहे त्यांतील बहुतेक कच्चे दुवे आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेतही आपल्याला आढळून येतात. कदाचित ते सार्वत्रिक स्वरूपाचेही असतील. दुसरे म्हणजे, त्या शबलता दूर करण्यासाठी जी संभाव्य व्यूहयोजना या अहवालामध्ये मांडण्यात आलेली आहे तिचा उद्या खरोखरच तसाच्यातसा अंमल झाला तर एकंदरीने वैश्विक अर्थकारणावरही त्याचे दूरगामी परिणाम जाणवावेत. अमेरिकी आर्थिक सुबत्तेचे संवर्धन करण्याबाबत या अहवालामध्ये जे मंथन करण्यात आलेले आहे त्याचा जवळून परिचय करून घेणे उपयुक्त ठरावे ते त्यासाठीच.

अमेरिकी कंपन्या आणि अमेरिकी रोजगाराचे आज दशकानुदशके स्थलांतर चालू असल्याची वस्तुस्थिती विवेचनामध्ये सुरुवातीसच मांडण्यात आलेली आहे. बराच काळ हा परिपाठ तिथे नांदत आलेला असला तरी २००८ साली उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टानंतर मात्र अमेरिकी अर्थव्यवस्थच्या सक्षमतेबाबतची आशंका दाट बनलेली आहे, असे अहवाल म्हणतो. आज दहा वर्षांनंतर त्या हाद-यातून अमेरिकी अर्थव्यवस्था सावरताना दिसत असली तरी आज दृश्यमान होणारे ते पुनरुत्थान कमकुवत आहे, असेही निरीक्षण हा अहवाल मांडतो. खुल्या आणि उदार व्यापाराची व्यवस्था जगभरात नांदावी यासाठी अमेरिकेने आजवर जो पाठपुरावा केला त्यांमागे अमेरिकी धोरणकर्त्यांची एक विशिष्ट भूमिका होती. ज्या देशांची मूल्यव्यवस्था अमेरिकी आर्थिक तसेच राजकीय मूल्यांपेक्षा निराळी होती ते देश, मुक्त बाजारपेठीय अर्थकारणावर बेतलेल्या अर्थप्रणालींच्या अंगीकाराद्वारे आपल्या देशातील राजकीयप्रणाली व मूल्यव्यवस्था यांत अनुरूप बदल घडवून आणतील अशी अपेक्षा त्यांमागे होती. मात्र, या बाबतीत अमेरिकेच्या पदरी केवळ निराशाच आली, असा या अहवालाचा सूर आहे. हा निर्देश अर्थातच चीनकडे आहे, हे तात्काळ ध्यानात येते.



या पार्श्वभूमीवर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील विद्यमान कमकुवत दुव्यांचा लेखाजोखा या अहवालात तपशीलवार मांडलेला सापडतो. वित्तीय अरिष्टानंतरच्या दशकभरात अमेरिकी बेरोजगारीचा सरासरी दर घटलेला असला तरी आर्थिक पुनरुत्थान दुबळेच आहे. अमेरिकी उत्पादन वाढीचा सरासरी वार्षिक वेग आजही दोन टक्क्यांच्या परिघात घुटमळताना दिसतो. औषधे महागलेली आहेत. वास्तव वेतनवाढीचा सरासरी दर खुरटलेला आहे. आरोग्यविमा महाग झालेला आहे. महाग बनलेल्या शिक्षणामुळे विद्यार्थीवर्गाच्या शैक्षणिक कर्जात वाढ घडून आलेली दिसते. उत्पादकता वाढीचा सरासरी वेगही मंदावलेला आहे.

अहवालाच्या निष्कर्षानुसार, अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या या दुरवस्थेस अनेक घटक कारणभूत ठरतात. अर्थकारणातील अतिरिक्त सरकारी हस्तक्षेपापायी आर्थिक वाढ आणि रोजगार वाढ यांचा सरासरी वार्षिक वेग मंदावला. नियामक व्यवस्थेचा खाक्या आणि व्यापारउद्योगांवरील करविषयक धोरण यांपायी अमेरिकी उद्योगांच्या स्पर्धात्मकतेला हानी पोहोचून त्यांपायी व्यवसायाचे बस्तान अमेरिकेबाहेरच हालवण्यास कंपन्यांना प्रोत्साहन मिळत राहिले. शासनसंस्थेच्या अतिरिक्त नियमनापायी लहान उद्योग भाराखाली आले. वित्तीय अरिष्टानंतर कडक बनवण्यात आलेल्या बँकिंगविषयक नियमनापायी नवीन बँकांची स्थापना मंदावली तर शेकडो लहान बँका बंद पडल्या. पतपुरवठ्याबाबत ताठर बनलेल्या धोरणापायी ग्राहकवर्गाला कर्जांची उपलब्धता घटली. त्याचा प्रतिकूल परिणाम अमेरिकी बाजारपेठेतील मागणीवर घडून आला.

अमेरिकी अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांची दुःस्थिती, हे सध्याचे एक मोठे दुखणे ठरते आहे. पायाभूत नागरी सुविधांच्या हलाखीमुळे अर्थव्यवस्थेतील जोषच जणू हरपलेला दिसतो. त्या हलाखीचा सगळ्यांत मोठा फटका बसताना दिसतो तो लघुउद्योगांच्या नफाप्रदतेला. या सगळ्यांतून कामगारांच्या उत्पादकतावाढीलाही झळा पोहोचत आहेत. उत्पादकतावाढीचा वार्षिक सरासरी वेग खुरटलेला असल्याने वेतनवाढही मरगळलेली राहून त्याचा फटका पुन्हा अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मागणीला बसतो आहे.

**भविष्यातील आर्थिक धोरण आणि प्राधान्यक्रम**

ही अशी सगळी कोंडी ध्यानात घेऊन, अमेरिकी अर्थव्यवस्थेची सुबत्ता पुनर्स्थापित करण्यासाठी येत्या काळात कोणत्या प्रकारची धोरणे ट्रम्प यांच्या शासनाच्या विचाराधीन आहेत त्यांची जंत्री हा अहवाल देतो. अमेरिकी अर्थव्यवस्थेस नवसंजीवनी प्रदान करणे, हे अर्थातच सर्वाधिक महत्त्वाचे उद्दिष्ट ठरते. अमेरिकी कामगारवर्गाच्या हितांचे संरक्षण-संवर्धन जारी राखण्यावर धोरणविधानाचा भर येत्या काळात प्रामुख्याने राहील. वस्तुनिर्माण उद्योगाच्या पायाचे सक्षमीकरण घडवून आणण्यावर शासनाच्या प्रयत्नांचा झोत येत्या काळात स्थिर असेल. अमेरिकी मध्यमवर्गासाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबाबत सरकार प्रयत्नशील राहील. आगामी काळात नवसर्जनाला अनेक आघाड्यांवरून प्रोत्साहन दिले जाईल, असे हा अहवाल सांगतो. अमेरिकी उद्योगव्यवसाय क्षेत्रांच्या तंत्रज्ञानात्मक आघाडीचे संवर्धन साधण्यावर येत्या काळात ट्रम्प यांचे सरकार भर देईल. त्याच वेळी दुसरीकडे, पर्यावरणाचे संवर्धन आणि अमेरिकेच्या ऊर्जावर्चस्वाचा परीघ सतत विस्तारत राहील, याचीही काळजी शासनसंस्था घेत राहील.

नवसर्जनाला प्रोत्साहन देणे, अमेरिकी वस्तुनिर्माण उद्योगाच्या पायाचे सक्षमीकरण साध्य करणे आणि अमेरिकी कामगारांच्या हिताचे संरक्षण व संवर्धन घडवून आणणे या दोन उद्दिष्टांमध्ये ट्रम्प यांच्या 'अमेरिका फर्स्ट' या धोरणदृष्टीचे प्रतिबिंब स्पष्टपणे डोकवते. २००८ साली उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टाची बीजे अमेरिकी मध्यमवर्गासाठी उपलब्ध असलेल्या रोजगारसंधींच्या संकोचामध्ये रुजलेली होती असे विश्लेषण काही अर्थवेत्यांनी मांडलेले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर डॉ. रघुराम राजन हे त्यापैकीच एक. त्यांमुळे, अमेरिकी मध्यमवर्गाला उपलब्ध असणा-या व होणा-या रोजगारसंधींचा आलेख चढता राहावा, यासाठी ट्रम्प यांचे प्रशासन दक्ष असेल हे सहज समजण्यासारखे आहे. अमेरिकी ऊर्जावर्चस्वाचा परीघ विस्तारत राहण्यासाठी कार्यशील राहण्याबाबत या अहवालात करण्यात आलेला संकेत, आखातातील देशांबाबतच्या अमेरिकी धोरणाइतकाच शेल वायूसारखे इंधनांचे पर्यायी स्त्रोत विकसित करण्याबाबतच्या अमेरिकी निर्धाराकडेही निर्देश करतो.



अमेरिकी अर्थव्यवस्थेची सुबत्ता वाढवण्याच्या दृष्टीने येत्या काळात अमेरिकी आर्थिक तसेच औद्योगिक धोरणांची दिशा कशी असेल, यांबाबत या दस्तऐवजात जे विवरण करण्यात आलेले आहे ते विशेषकरून भारत आणि चीन या दोन अर्थव्यवस्थांच्या लेखी अत्यंत संवेदनशील ठरते.

अमेरिकी अर्थव्यवस्थेची मजबूत सुबत्ता हा राष्ट्रीय सुरक्षेचा पाया ठरतो, या विधानाला अनुसरत अमेरिकी अर्थव्यवस्थेचे पुनरुत्थान घडवून आणण्याच्या दृष्टीने या अहवालात धोरणात्मक बाबींचा प्राधान्यक्रम नमूद केलेला आहे. अमेरिकी अर्थकारणाशी संबंधित असणारी अनावश्यक शासकीय बंधने व नियमनांचे विसर्जन घडवून आणणे, हे या प्राधान्यक्रमातील पहिले सूत्र होय. करांच्या अवास्तव बोज्यापायी अमेरिकी उद्योगांनी अन्य देशांच्या भूमीवर आपला कारभार स्थापन करण्याचा पर्याय स्वीकारला, असे ट्रम्प यांच्या शासनाचे मत असल्याने; सोपी, सुटसुटीत, न्याय्य आणि विकासपूरक अशी करप्रणाली व्यवहारात लागू करणे, हा या प्राधान्यक्रमातील दुसरा मुद्दा होय. मुख्यतः, अमेरिकी मध्यमवर्गाला दिलासा देणे आणि अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये चांगल्या दर्जाचा, गुणवत्तापूर्ण रोजगार पुरेशा प्रमाणावर निर्माण करणे, हे या करसुधारणांमागील दोन मुख्य हेतू असल्याचे हा अहवाल म्हणतो.

अमेरिकी अर्थव्यवस्थेतील पायाभूत सेवासुविधांचा दर्जा सुधारण्यावर भर देणे ही या प्राधान्यक्रमातील तिसरी बाब होय. दूरसंचार सेवा, रेल्वे, महामार्ग, बंदरे आणि जलमार्ग, हवाईसेवा अशा वाहतूक व दळणवळणाच्या विविध सुविधांचा दर्जा उंचावण्यासाठी सरकार खर्च करेल तसेच प्रयत्नशील बनेल, असे या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे. अमेरिकी सरकारच्या तिजोरीवरील कर्ज आजमितीला जवळपास २० ट्रिलियन डॉलरच्या घरात आहे (एक ट्रिलियन डॉलर म्हणजे एकावर १२ शून्ये). पायाभूत सेवासुविधा सुधारायच्या म्हटल्यावर सरकारला खर्च करणे भाग आहे. मग, त्याचा परिणाम तुटीवर होणारच. तेव्हा, वित्तीय अथवा राजकोषीय (फिस्कल) उत्तरदायित्वाच्या जोपासणीमधून सरकारी तिजोरीवरील कर्जभार हलका करण्यावर भर देणे, हा प्राधान्यक्रमात चौथ्या स्थानावर असलेला मुद्दा आहे. सरकारी खर्चावर मर्यादा आणणे, सरकारी ***(कृपया पृष्ठ २४ पाहावे)***

आर्थिक

# कसे असेल चालू वर्षातील अर्थचित्र...! (?)

अमेरिकी 'सब्प्राइम' कर्जाच्या अरिष्टातून सावरत असलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेच्या पुढ्यात आज एक मोठे प्रश्नचिन्ह उभे ठाकलेले आहे. २००८ सालात उद्भवलेल्या वित्तीय अरिष्टातून निपजलेल्या मंदीमुळे वैश्विक अर्थव्यवस्थेला असा दणका बसला की, प्रचलीत अर्थकारणाचा एकंदरीने विचार करताना आताशा '२००८ पूर्वीची जागतिक अर्थव्यवस्था' आणि '२००८ नंतरची जागतिक अर्थव्यवस्था' अशी नवीन विभागणी व परिभाषाच आर्थिक विश्लेषणाच्या प्रांतात स्थिरावलेली दिसते. त्यामुळे, त्या वित्तीय अरिष्टाला चालू आर्थिक वर्षात १० वर्षे पुरी होत असताना, "२००८ सालापूर्वीचे अर्थचित्र वैश्विक अर्थकारणात पुन्हा केव्हा उमटेल आणि उमटेल तरी का ?", असा प्रश्न सगळ्यांच्याच मनात आज रुंजी घालतो आहे.

त्याला कारणही तसेच आहे. आर्थिकदृष्ट्या विकसित अशा पश्चिमी राष्ट्रांमध्ये नागरिकांचे सरासरी वय उंचावते आहे. जननदरामध्ये सरासरीने लक्षणीय घट तिथे साध्य झालेली असल्याने देशोदेशींच्या लोकसंख्येमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण वाढते आहे. या नागरिकांचे निवृत्तिवेतनादी लाभ, त्यांना पुरविण्यात येणारे सुरक्षा कवच अशांसारख्या बाबींवर तिथल्या सरकारांना भविष्यात कराव्या लागणा-या खर्चाची मात्रा सातत्याने वाढत जाणार आहे. त्या मानाने उत्पन्न, उत्पादन आणि संपत्तीच्या निर्मितीमध्ये त्या ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग कमी असेल आणि वाढत्या वयाबरोबर तो घटतच जाईल. तेव्हा, हे व्यस्त समीकरण पेलायचे तर ठोकळ उत्पादनवाढीचा वेग सणसणीत असणे पश्चिमी राष्ट्रांसाठी अनिवार्य ठरते. तर, जगाच्या विकसनशील पट्ट्यातील देशांमध्ये दिवसेंदिवस बेरोजगारीची समस्या उग्र बनत चाललेली आहे. चांगल्या दर्जाचा, उत्पादक, कौशल्यपूर्ण आणि मनुष्यबळरूपी भांडवलामध्ये भर घालणारा रोजगार पुरेशा प्रमाणावर निर्माण करण्यासाठीही पुन्हा उत्पादनवाढीचा वेग दमदार असणे तिथे निकडीचे ठरते.



त्यामुळे, जागतिक अर्थव्यवस्थेतील ठोकळ उत्पादन (ग्लोबल ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट) चालू वर्षात आणि एकंदरच नजीकच्या भविष्यात सरासरी काय दराने दरवर्षी वाढत राहील यांबद्दल सगळ्यांनाच प्रचंड उत्सुकता आहे. साहजिकच, गोल्डमन सॅक्ससारख्या बहुराष्ट्रीय वित्तीय खासगी कंपनीपासून ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारख्या मातबर जागतिक व्यासपीठापर्यंत विविध संघटनांनी जागतिक अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग काय असेल याबाबतचे अंदाज घेण्यासाठी आपापल्या परीने अभ्यास व संशोधन केलेले दिसते. त्या अभ्यासांचे निष्कर्ष, त्यांतील साधर्म्य व तफावत जाणून घेणे उपयुक्त आणि उद्बोधक ठरेल.

या सगळ्या चर्चेला सुरुवात आपण गोल्डमन सॅक्सने वर्तवलेल्या अंदाजांपासून करूयात. गोल्डमन सॅक्स ही एक बलाढ्य अशी अमेरिकी वित्तीय कंपनी. जगातील अनेक देशांत तिचा व्याप पसरलेला. अनंत प्रकारच्या वित्तीय सेवा ती पुरवते. वित्तीय संस्था, खासगी कॉर्पोरेट उद्योग, सरकारे...अशांसारख्या नाना घटकांना गोल्डमन सॅक्स सेवा पुरवत असते. त्यामुळे, जागतिक अर्थव्यवस्थेच्या संभाव्य गतिविधींकडे या खासगी कंपनीने अधिक सतर्कपणे व अधिक चिकित्सकपणे बघावे, हे ओघानेच येते. गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार २०१८ या चालू वर्षात जागतिक उत्पादन साधारणपणे (वास्तव) चार टक्क्याने उंचावेल. २०१७ साली ही वाढ होती ३.७ टक्क्यांची. गोल्डमन सॅक्सच्या विश्लेषणानुसार, २०१० सालानंतर जागतिक अर्थव्यवस्था प्रथमच इतपत सरस कामगिरी बजावताना दिसते.

सगळ्यांत महत्त्वाची आणि दिलासादायक बाब म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्थेतील या पुनरुत्थानाचा पाया चांगल्यापैकी विस्तृत आहे. जगाच्या सर्वाधिक विकसित पट्ट्यातील देशांपासून ते विकसनशील देशांच्या पट्ट्यापर्यंत सगळीकडेच अर्थकारण सावरताना दिसते आहे. सार्वत्रिक उत्पादकतवाढीच्या पाउलखुणा दिसू लागलेल्या आहेत. जगभरातील अनेक देशांत यापूर्वी निर्माण करण्यात आलेल्या अतिरिक्त उत्पादनक्षमतांचा वापर जवळपास पूर्णत्वास जातो आहे. अमेरिकेच्या तुलनेत, या बाबतीत, दक्षिण युरोप पिछाडीवर दिसतो. कारण, तिथे मात्र अतिरिक्त उत्पादनक्षमता आजही ब-यापैकी पडून आहे.

## मुख्य भरवसा विकसनशील देशांचा

एकंदरीने विचार करता, २०१८ या चालू वर्षात विकसित बाजारपेठीय व्यवस्था नांदणा-या जगाच्या विकसित पट्ट्यातील उत्पादनवाढ सरासरीने २.३ टक्के अशी राहील, असे गोल्डमन सॅक्सचे भाकित आहे. त्या मानाने विकसनशील देशांच्या पट्ट्यातील उत्पादन वाढ सरासरीने ५.६ टक्के अशी राहील. म्हणजे, वैश्विक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानामध्ये, नजीकच्या भविष्यात तरी, विकसनशील व उभरत्या अर्थव्यवस्थांचाच अधिक भरवसा वाटेल, असे चित्र आहे. विकसित देशांच्या समूहात सगळ्यांत सरस कामगिरी राहील ती अमेरिकेचीच. कारण, अमेरिकी अर्थव्यवस्था २०१८ साली २.५ टक्क्यांची वाढ नोंदवेल, असा गोल्डमन सॅक्सचा अंदाज सांगतो. त्यांखालोखाल युरो देश (२.२ टक्के), जपान (१.६ टक्के) आणि ब्रिटन (१.३ टक्के) अशी उतरती भाजणी दिसते. 'विकसित देशांच्या चमूतील सर्वांत क्षीण भिडू', असे ब्रिटनचे वर्णन करणे त्यांमुळे भाग पडते. विकसनशील देशांच्या गटात पहिल्या स्थानावर भारतीय अर्थव्यवस्था असेल आणि भारताचे ठोकळ देशी उत्पादन २०१८ या चालू वर्षात आठ टक्क्यांची वास्तव वाढ नोंदवेल, असे भाकित गोल्डमन सॅक्सचा अभ्यास वर्तवतो. चिनी अर्थव्यवस्थेचे स्थान (अपेक्षित उत्पादनवाढ ६.५ टक्के) भारतानंतर दिसते. 'ब्रिक्स' अर्थव्यवस्थांच्या गटातील रशिया (३.३ टक्के) आणि ब्राझील (२.७ टक्के) हे दोन देश चीननंतर येतात.

गोल्डमन सॅक्सने केलेल्या अभ्यासानुसार, विकसित देशांच्या पट्ट्यात बेरोजगारीचा वित्तीय अरिष्ट ऐन भरात असताना लक्षणीयरीत्या उंचावलेला सरासरी दर उतरून आता २००८ सालापूर्वीच्या पातळीपर्यंत पूर्ववत आलेला आहे. त्याच्याच जोडीने श्रमिकांच्या उत्पादकतावाढीचा सरासरी वेगही वाढतो आहे. परंतु, श्रमिकांच्या वास्तव वेतनदर त्याच्या जोडीनेच उंचावण्याची चिन्हे मात्र दिसत नाहीत. जागतिक स्तरावर उत्पादनवाढीचा सरासरी वेग वाढत असला तरी बेरोजगारी चिवटपणे बस्तान बसवून आहे, या आजवरच्या चित्रात बदल होत असल्याचे हे संकेत. देशोदेशींच्या अतिरिक्त उत्पादनक्षमता संपुष्टात येत असल्याने भविष्यात महागाईचा सरासरी दर उंचावण्याची शक्यता हे अभ्यास वर्तवतात.



येत्या काळातील जागतिक अर्थचित्राबाबत गोल्डमन सॅक्स ब-यापैकी आशादायक चित्र एकीकडे मांडत असली तरी; दहा वर्षांपूर्वीच्या वित्तीय अरिष्टामुळे हादरलेल्या वैश्विक अर्थव्यवस्थेचे अलीकडे घडून येत असलेले पुनरुत्थान क्षीण आहे, असा सूर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे अभ्यास दुसरीकडे लावतात. जागतिक अर्थव्यवस्था पुन्हा नव्याने उभारी घेते आहे यांबाबत गोल्डमन सॅक्स आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या दोहोंत एकवाक्यता आहे. जगातील विविध देशांमध्ये चालू झालेली गुंतवणूक वाढ, गतिमान बनत असलेली औद्योगिक उत्पादनवाढ आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा वाढत असलेला सरासरी वेग या तीन घटकांचा या आर्थिक पुनरुत्थानाला हातभार लागतो आहे, हे निःसंशय. परंतु, हे पुनरुत्थान अजूनही क्षीण आहे, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे म्हणणे दिसते. त्यांमुळे, नाणेनिधीच्या अंदाजानुसार, २०१८ या वर्षात जागतिक उत्पादन ३.७ टक्क्यांची वास्तव वाढ नोंदवेल. गोल्डमन सॅक्स हीच वाढ चार टक्क्यांची अंदाजतो. अर्थात्, ३.७ टक्के आणि चार टक्के ही, जागतिक उत्पादनवाढीबाबत दोन वेगळ्या संस्थांनी वर्तवलेल्या संभाव्य दोन दरांतील तफावत गंभीर अथवा भीषण अजिबातच नाही.

वैश्विक अर्थव्यवस्थेच्या उत्पादनातील वाढ क्षीण जरी असली तरी जगभरातील महागाईच्या सरासरी दरावर तिचा काही ना काही प्रभाव दिसायला हवा, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे म्हणणे आहे. महागाईचा सरासरी दर जगभरात निम्नस्तरावर नांदतो आहे. याचाच अर्थ, वैश्विक अर्थव्यवस्थेतील मागणीत ठाण मांडून बसलेली मलूलता अजूनही पुरती हटलेली नाही, असे नाणेनिधीचे प्रतिपादन होय. जागतिक अर्थव्यवस्थेतील उत्पादनवाढीचा वेग आताशा उंचावताना दिसत असला तरी, त्या वेगाला अटकाव होतो आहे. श्रमिकांच्या उत्पादकतावाढीचा सरासरी वार्षिक वेग आजही क्षीणच आहे. दुसरे म्हणजे, विकसित पट्ट्यातील देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे आणि पर्यायाने निवृत्त नागरिकांचे प्रमाण एकंदर लोकसंख्येतील प्रमाण सरासरीने उंचावते आहे. दरडोई उत्पन्नवाढीच्या वेगात दमदार वाढ घडून येण्यास हे तीन घटक अटकाव करत आहेत, असे नाणेनिधीचे विश्लेषण सांगते. *(कृपया पृष्ठ क्रमांक २८ पाहावे)*

शिक्षण

# पदवी आहे पण कौशल्यांचे काय...?

रोजगारवाढरहित विकास (जॉबलेस ग्रोथ) ही सध्या जवळपास सगळ्याच जगापुढील भीषण समस्या बनते आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा फैलाव आणि अंगीकार उत्पादनव्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणावर चालू झालेला असल्याने विकसित देशांच्या पट्ट्यातील रोजगारवाढीसंदर्भातील चर्चा अलीकडे अधिक प्रकर्षाने पुढ्यात येते आहे. अर्थात, विकसित पश्चिमी देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे एकूणांतील प्रमाण सरासरीने वाढते असल्याने तरूण मनुष्यबळाची त्यांना वानवा जाणवते आहे. त्यांमुळे, यंत्रमानवांच्या वाढत्या संचाराबाबत त्या देशांना जरी फारशी फिकीर नसली तरी विकसित राष्ट्रांमधील नोक-यांकडे डोळे लावून बसलेल्या विकसनशील देशांमधील तरूण रोजगारेच्छूंच्या पोटात मात्र गोळा उभा राहतो आहे. तिकडे, खर्चात बचत करत असतानाच दुसरीकडे वस्तू अथवा सेवेचा गुणात्मक दर्जा अव्वल राखण्यासाठी मानवी शक्तीबुद्धीच्या ठायी कृत्रिम बुद्धिमत्तेचे उपयोजन करण्याची लाट विकसनशील देशांमधील संघटित कॉर्पोरेट विश्वामध्ये येऊ लागलेली दिसत असल्यामुळे तिस-या जगातील राष्ट्रांमधील धोरणकर्ते ‘जॉबलेस ग्रोथ’च्या आव्हानापायी सचिंत बनत आहेत.

चांगल्या दर्जाचा, उत्पादक स्वरूपाचा रोजगार पुरेशा प्रमाणावर निर्माण होणे अथवा न होणे, या समस्येचा एक धागा देशोदेशींच्या शिक्षणक्षेत्राशी अतिशय घनिष्ठपणे जोडलेला आहे, हे वास्तव या कोलाहलात आताशा प्रकर्षाने पृष्ठभागावर येते आहे. नोकरीच्या शोधात असणा-या पदवीधरांकडे पदवी असते परंतु त्यांची रोजगारक्षमता मात्र कमालीची कमकुवत असल्यामुळे, एकीकडे हातांना रोजगार नाही आणि दुसरीकडे उद्योगधंद्यांना योग्य असे प्रशिक्षित मनुष्यबळ मिळत नाही, असे मोठे गुंतागुंतीचे चित्र आज अनेक ठिकाणी दिसते. पदवी आहे पण ज्ञान आणि कौशल्ये नसल्यामुळे रोजगारक्षमता दुबळी असल्याचे हे वास्तव अत्यंत दाहक आणि दुःखद आहे.



शाळा व महाविद्यालयांच्या चार भिंतींमधील शिक्षणाला व्यावसायिक अथवा धंदेशिक्षणाची जोड नसल्यामुळे पदवीधरांना नोकरी अथवा रोजगार मिळण्याबाबत अडचणी जाणवतात, असे एक स्पष्टीकरण आपल्या देशात दिले जाते. कोणत्या ना कोणत्या प्रकारचे व्यावसायिक, तांत्रिक, तंत्रशास्त्रीय, धंदेशिक्षण घेतलेल्या आणि वय वर्षे २० ते २४ या वयोगटातील उमेदवारांचे आपल्या देशातील श्रमदलामध्ये असणारे प्रमाण जेमतेम पाच टक्क्यांच्या परिघात असल्याचे दारूण वास्तव २१व्या शतकाच्या पहिल्या दशकातच सगळ्यांच्या पुढ्यात प्रगटले होते. श्रमांच्या बाजारपेठेत ज्या ज्ञानकौशल्यांना मागणी आहे त्यांपेक्षा वेगळेच ज्ञान व कौशल्ये संपादन केलेल्या उमेदवारांना नोकरी अथवा रोजगार मिळणे/मिळवणे दुरापास्त बनावे, हे स्वाभाविक ठरते. अशा परिस्थितीमुळे उद्‌भवणा-या बेरोजगारीस अर्थशास्त्रीय परिभाषेत संरचनात्मक बेरोजगारी (स्ट्रक्चरल अन्‌एम्प्लॉयमेन्ट) असे म्हणतात. श्रमांच्या बाजारपेठेत मागणी असणा-या ज्ञान तसेच कौशल्यांचा समावेश प्रचलीत शिक्षणव्यवस्थेतील अभ्यासक्रमांत घडवून आणून या प्रकारच्या बेरोजगारीवर उतारा शोधून काढता येणे शक्य असते.

परंतु, उच्च शिक्षणातील अगदी अभियांत्रिकीसारख्या ज्ञानशाखेतील पदवी पदरामध्ये असूनही एकीकडे उद्योगांना प्रशिक्षित, कुशल कर्मचारी मिळत नाही आणि त्याच वेळी दुसरीकडे पदवीधर नोक-यांच्या शोधात हिंडत आहेत, असे चित्र दिसते तेव्हा गुंतागुंत अधिकच वाढते. म्हणजे, इथे प्रश्न रोजगाराच्या उपलब्धतेइतकाच, उपलब्ध असणारा रोजगार पदरात पाडून घेण्याच्या होतकरू उमेदवारांच्या क्षमतेचाही आहे, ही बाब उघड आहे. या प्रश्नाच्या मुळाशी जाताना, ‘ज्ञान’ आणि ‘कौशल्ये’ या दोन भिन्न बाबी असून रोजगार मिळवण्यासाठी कौशल्याची जोड ज्ञानाला देणे आवश्यक वा अनिवार्य ठरत असते, या दोन गोष्टी पचनी पाडून घेणे गरजेचे आहे. केवळ पदवी मिळाल्याने संबंधित ज्ञान त्या उमेदवाराला पुरेसे असेलच याची जशी खात्री देता येत नाही; त्याचप्रमाणे, पुस्तकी ज्ञान आहे म्हणून नोकरी अथवा रोजगार मिळेलच याचीही हमी आता या पुढे मिळणार नाही. मिळवलेल्या ज्ञानाला उचित अशा प्रकारच्या कौशल्यांची जोड पुरवत स्वतःची रोजगारक्षमता सक्षम बनवणे आता कळीचे बनते आहे.

### बोलके व चिंतनीय सर्वेक्षण

अलीकडील काही अभ्यास व सर्वेक्षणे नेमके हेच वास्तव पुढे मांडत आहेत. शिक्षित उमेदवारांची रोजगारक्षमता उंचावण्यासाठी मार्ग अथवा उपाययोजना सुचविणा-या आपल्या देशातील एका खासगी कंपनीने आता आता केलेला एक अभ्यास आणि त्यांतून निघणारे निष्कर्ष केवळ चिंतनीयच नव्हे तर चिंताजनकही आहेत. नमुना पाहणी तत्त्वावर ही पाहणी केलेली असली तरी त्यासाठी निवडण्यात आलेल्या नमुन्याचे आकारमान चांगल्यापैकी मोठे होते. देशभरातील सुमारे ६५०पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून २०१५ साली अभियांत्रिकीची पदवी संपादन करून बाहेर पडलेल्या दीड लाखांहून अधिक अभियंत्यांच्या पाहणीअभ्यासावर हे निष्कर्ष बेतलेले आहेत. माहिती-तंत्रज्ञान आणि माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवा, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सिव्हिल अशा अभियांत्रिकीमधील विविध शाखांच्या पदवीधरांचा या सर्वेक्षणामध्ये समावेश होता. 'अभियांत्रिकी' या ज्ञानशाखेतील पदवी धारण केलेल्या उमेदवारांच्या रोजगारक्षमतेचा अभ्यास करणे, हा या सर्वेक्षणामागील हेतू होता. अभियांत्रिकी पदवीधरांच्या रोजगारक्षमतेची चाचपणी करण्यासाठी चाचण्यांची आखणी करण्यात आलेली होती.

सर्वेक्षणादरम्यान जारी केलेल्या चाचण्यांद्वारे पुढ्यात अवतरलेले निष्कर्ष मननीय आणि चिंताजनक असे दोन्ही आहेत. अभियांत्रिकीची पदवी धारण केलेल्यांपैकी जेमतेम १८ टक्के पदवीधरांच्या ठायी 'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्' या क्षेत्रामध्ये उपलब्ध असणा-या नोक-या मिळवण्याची क्षमता होती, असे हे सर्वेक्षण सांगते. तर, अभियांत्रिकीच्या पदवीधरांपैकी केवळ ३.६७ टक्के इतके अत्यल्प उमेदवार 'सॉफ्टवेअर प्रॉडक्ट्स्' या क्षेत्रातील नोक-यांच्या संधी पदरात पाडून घेण्याची क्षमता अंगी असणारे सापडले. संगणकाधारित अन्य प्रकारच्या सेवा पुरविण्याच्या उद्योगातील नोक-या मिळवण्याची क्षमता असणा-या अभियांत्रिकी पदवीधरांचे प्रमाण त्यांतल्या त्यांत चांगले म्हणजे ४०.५७ टक्के इतके दिसले. तर, माहिती-तंत्रज्ञानातील 'स्टार्ट अप्' कंपन्यांमधील रोजगार मिळवण्याची क्षमता असणारे अभियांत्रिकी उमेदवार होते केवळ ३.८४ टक्के इतकेच.



अभियांत्रिकीसारख्या उच्च व तांत्रिक ज्ञानशाखेतील पदवी मिळवलेल्या अभियंत्यांची नोक-या पदरात पाडून घेण्यासंदर्भातील रोजगारक्षमता इतकी दुर्बळ का असावी, हे कोडे कोणालाही पडावे. 'सॉफ्टवेअर प्रॉडक्ट्स्' तयार करणा-या कंपन्यांना गरज असते ती संगणकीय प्रणाली तयार करू शकणा-या तसेच 'अल्गॉरिदम्स्' तयार करता येणा-या अभियांत्रिकी पदवीधरांची. अभियांत्रिकीची पदवी मिळवलेल्या एकूणांतील जवळपास ९१ टक्के पदवीधर नेमक्या याच दोन कौशल्यांच्याबाबतीत कच्चे असल्याचे या पाहणीदरम्यान उघड झाले. केवळ हे पुरेसे नाही म्हणून की काय, विविध शाखांतील अभियांत्रिकीच्या एकंदर पदवीधरांपैकी जवळपास ७३ टक्के पदवीधर 'सॉफ्ट स्किल्स्'च्याबाबतीत मागे होते तर, जवळपास ६० टक्के पदवीधरांची 'कॉग्निटिव्ह' कौशल्येच कच्ची होती.

हे सगळेच चित्र विस्मयकारक आहे. कारण, सॉफ्टवेअर प्रॉडक्ट्स् तयार करणा-या कंपन्यांना नव्याने सेवेत दाखल होत असलेल्या अभियांत्रिकी पदवीधरांकडून प्रवेशाच्या त्या पातळीवर जी कौशल्ये अपेक्षित असतात ती कौशल्ये अभियांत्रिकीच्या नियमित अभ्यासक्रमाचा हिस्साच असतात. थेट संगणकशास्त्राशी संलग्न असे खास प्रशिक्षण त्या त्या कंपन्या यथावकाश आयोजित करत असतातच. पदवीधर उमेदवारांकडून अपेक्षा असते ती अभियांत्रिकीच्या क्षेत्रातील अभ्यासक्रमात अंतर्भूत असलेले पायाभूत ज्ञान व गाभाकौशल्ये चांगल्यापैकी आत्मसात केलेली असावीत, एवढीच. तरीही, अभियांत्रिकीची पदवी मिळवलेल्या उमेदवारांपैकी केवळ ३.६७ टक्के इतकेच अभियांत्रिकी पदवीधर सॉफ्टवेअर प्रॉडक्ट्स्च्या क्षेत्रात काम मिळवण्याबाबत सक्षम ठरावेत, ही वस्तुस्थिती खचितच गंभीर म्हणायला हवी. म्हणजेच, अभियांत्रिकीच्या कोणत्याही उपशाखेतील पदवी मिळवलेल्या अभियंत्याला योग्य ते आनुषंगिक प्रशिक्षण देऊन त्याला सॉफ्टवेअर इंजिनिअर बनवणे अत्यंत अवघड आहे, हेच वास्तव हा अभ्यास अधोरेखित करतो.

दुसरीकडे, अभियांत्रिकीची पदवी मिळवलेल्या एकूणांतील जवळपास १८ टक्के पदवीधर काय ते 'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्' पुरवणा-या कंपन्यांमधील नोक-या पदरात पाडून घेण्यासाठी आवश्यक असणा-या क्षमता अंगी असणारे होते, असे पाहणीदरम्यान आढळून आले.

**गाभाकौशल्यांचा पायाच कच्चा**

'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्'च्या क्षेत्रातील नोक-या मिळवण्यासाठी संबधित कंपनी/कंपन्या पुरवतील ते प्रशिक्षण, नोकरी लागल्यानंतरच्या तीन ते सहा महिन्यांत, आत्मसात करण्याची उमेदवाराची क्षमता त्याने सिद्ध करणे अपेक्षित असते. या क्षमता असतात 'सॉफ्ट स्किल्स्' आणि तंत्रशास्त्रीय कौशल्ये या दोन प्रकारांतील. 'सॉफ्ट स्किल्स्' आणि तंत्रशास्त्रीय कौशल्ये प्रदान करणारे जे प्रशिक्षण नोकरी दिलेली अथवा नोकरी देणारी कंपनी आयोजित करेल ते प्रशिक्षण पूर्ण करून ती कौशल्ये तीन ते सहा महिन्यांत संपादन करण्याची क्षमता उमेदवाराच्या ठायी असणे अपेक्षित असते. भाषिक क्षमता व 'कॉग्निटिव्ह' कौशल्ये या दोन बाबी अंगी असतील तर कंपनी आयोजित करत असलेले प्रशिक्षण पूर्ण करून तीन ते सहा महिन्यांत 'सॉफ्ट स्किल्स्' व तंत्रशास्त्रीय कौशल्ये हस्तगत करता येतात. वास्तविक पाहता, भाषिक क्षमता आणि 'कॉग्निटिव्ह' कौशल्ये ही दोन अतिशय मूलभूत अशी गाभाकौशल्ये होत. असे असूनही, आनुषंगिक प्रशिक्षण दिल्यानंतर अल्प काळातच 'सॉफ्ट स्किल्स्' आत्मसात करण्याची क्षमता अभियांत्रिकीची पदवी धारण केलेल्या एकूणांतील जवळपास ५२ टक्के उमेदवारांपाशी नसल्याचे ही पाहणी सांगते. तर, तंत्रशास्त्रीय कौशल्यविषयक प्रशिक्षण पूर्ण करून तंत्रशास्त्रीय कौशल्ये आत्मसात करण्याची क्षमता अंगी नसणारे अभियांत्रिकी पदवीधर एकूणांत जवळपास ४९ टक्के इतके दिसले.

म्हणजेच, अभियांत्रिकीची मूळ पदवी प्राप्त केल्यानंतर ज्या उद्योगांत अथवा कंपनीत नोकरी मिळेल त्या नोकरीशी संबंधित असे आनुषंगिक शिक्षण-प्रशिक्षण आत्मसात करण्याची क्षमता अभियांत्रिकी पदवीधरांच्या ठायी असावी, अशी आजची अपेक्षा दिसते. इथे मुख्य गरज अथवा अपेक्षा आहे ती सतत नवनवीन ज्ञान व कौशल्ये आत्मसात करण्याची क्षमता आपल्या अंगात निर्माण करण्याची व ती क्षमता जपण्याची. 'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्'च्या क्षेत्रात नोकरी करायची तर इंग्रजी भाषेशी उत्तम सलगी असणे हे अनिवार्य कौशल्य ठरते. अभियांत्रिकीचे पदवीधर या आघाडीवरही कमकुवत ठरतात, असे हा अभ्यास सांगतो. ***(कृपया पृष्ठ २७ पाहावे)***



*(पृष्ठ १४ वरून)*

कारभाराची कार्यक्षमता उंचावणे, करपद्धतीचे आधुनिकीकरण घडवून आणणे, अमेरिकी उद्योगांची स्पर्धात्मकता वाढवणे...अशांसारख्या उपायांचा अवलंब या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी येत्या काळात अमेरिकी शासन करेल, असे हा अहवाल म्हणतो. अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असणा-या श्रमशक्तीमध्ये गुणात्मक वाढ घडून यावी या दृष्टीने शिकाऊ प्रशिक्षणार्थी निर्माण करणा-या उपक्रमांना पाठबळ पुरवणे, हा प्राधान्यक्रमातील पाचवा मुद्दा आहे. येत्या काळात निर्माण होणा-या उच्च व अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त अशा रोजगारसंधी पदरात पाडून घेण्याची क्षमता सर्वसाधारण अमेरिकी कामगारामध्ये विकसित करणे, हा या उद्दिष्टामागील हेतू.

अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या सुबत्तेचे भरणपोषण करण्याच्या दृष्टीने ट्रम्प सरकारच्या विचाराधीन असणा-या या प्राधान्यक्रमातील सहावे आणि अखेरचे जे अस्त्र आहे त्यांतील राजकीय आशय जागतिक स्तरावर पडसाद उमटवणारा असाच आहे. वैश्विक अर्थव्यवस्थेमध्ये मुक्त, न्याय्य आणि परस्परांच्या आर्थिक-व्यापारी-वित्तीय हितसंबंधांची जपणूक करणा-या

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५** **किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

नातेसंबंधांची वीण विणली जावी, यासाठी येत्या काळात कार्यरत राहणे, हा या प्राधान्यक्रमातील सहावा मुद्दा आहे. जगातील काही देशांमध्ये निर्माण करण्यात आलेल्या अतार्किक उत्पादनक्षमता, काही देशांतील सरकारे आपापल्या उद्योगांना अदा करत असलेली औद्योगिक अनुदाने यांमुळे देशादेशांमधील व्यापाराचा पोत दूषित बनत असल्याची मल्लीनाथी अहवालात करण्यात आलेली आहे. या प्रतिपादनाचा थेट रोख चीनवर आहे, ही बाब लगेचच ध्यानात येते. अर्थात्, टाळी एक हाताने वाजत नसते, हे वास्तवही अहवाल मान्य करतो. अन्याय्य अशा व्यापारव्यवस्थेस अमेरिकेकडून दशकानुदशके पुष्टी दिली गेली, असे इथे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. परिणामी, अमेरिकेच्या व्यापारतोलामध्ये जे असंतुलन आजवर पोसले गेलेले आहे, ते दूर करण्याचा निर्धार अहवालात व्यक्त होतो. त्या दृष्टीने अमेरिकेची निर्यात वाढवण्यासाठी आवश्यक अशा संधी निर्माण करण्याचा मनोदय या दस्तऐवजात व्यक्त झालेला आहे.

मुक्त व खुल्या बाजारपेठेच्या तत्वांनुसार कार्यान्वित असणा-या अथवा होणा-या व्यापारव्यवस्थेमध्ये स्पर्धा असणारच हे मान्य करत, हा अहवाल, अशी व्यापारी स्पर्धा निकोप असण्याची गरज अधोरेखित करतो. एकंदरीनेच समान मूल्यव्यवस्था जोपासणारे समानधर्मा देश वैश्विक अर्थकारणात त्यांची त्यांची जबाबदारी निभावतील त्याच वेळी देशादेशांदरम्यान न्याय्य आणि परस्परांच्या आर्थिक-वित्तीय-औद्योगिक हिताचे रक्षण करणारे संबंध निर्माण होतील. आणि असे संबंध निर्माण होतील तेव्हाच आणि ते तसे निर्माण झाले तरच वैश्विक बाजारपेठेमधील स्पर्धा निकोप असणे शक्य बनेल, असे अत्यंत सूचक प्रतिपादन या अहवालात मांडण्यात आलेले आहे. अमेरिकी अर्थव्यवस्थेला आजवर ज्या व्यापारी स्पर्धेचा सामना करावा लागलेला आहे त्यांत काही स्पर्धक देशांची धोरणे व भूमिका न्याय्य नव्हती, असा तक्रारीचा सूर या कथनात स्वच्छ परंतु अंतःस्थ आहे. अमेरिकेबरोबरच्या व्यापारादरम्यान चिनी युआनचे अमेरिकी डॉलरबरोबर असणारे विनिमय मूल्य नेहेमीच चिनी उत्पादक व निर्यातदारांच्या पथ्यावर पडणारे असेल या पद्धतीने विनिमय मूल्याच्या निर्धारणात चिनी धोरणकर्ते आजवर जो हस्तक्षेप करत आलेले आहेत, त्यांकडे या विवेचनाचा सारा रोख आहे.



याही पुढे जात या अहवालात आणखी एक आवाहन करण्यात आलेले आहे. वैश्विक समुदायाची सामाईक सुरक्षा आणि सुबत्ता यांच्यावर आक्रमण करणा-या आर्थिक आक्रमकांचा पाडाव करणे, हे आजचे एक आव्हान असून त्यासाठी औद्योगिकदृष्ट्या विकसित अशा लोकशाही राष्ट्रांनी सहकार्याचा हात पुढे करावा, असे प्रतिपादन इथे करण्यात आलेले आहे. इथेही चीनकडे असलेला निर्देश पुरेसा स्पष्ट आणि बोलका आहे. चीनचे सर्वेसर्वा शि जिनपिंग यांनी १८ ऑक्टोबर २०१७ रोजी केलेल्या भाषणातील एका मुद्याचे पडसाद अमेरिकी सुरक्षा व्यूहरचनेचा आराखडा जगापुढे मांडणा-या दस्तऐवजात उमटलेले दिसतात. अन्य देशांतील राजकीय व्यवस्थेची नक्कल चीन करणार नाही, असा निःसंदिग्ध उच्चार जिनपिंग यांनी त्यांच्या भाषणादरम्यान केलेला होता. म्हणजेच, जगातील अन्य लोकशाही राष्ट्रांच्या मार्गाने जाण्याऐवजी, चिनी विचारधारेमध्ये लपेटलेला समाजवाद नवीन युगासाठी अंगिकारण्याची भाषा जिनपिंग यांनी तेव्हा केलेली होती. या पार्श्वभूमीवर, चीनने आजवर राबवलेल्या आक्रमक आर्थिक दहशतीचा सामना करण्यासाठी जगातील लोकशाही राष्ट्रांनी अमेरिकेला सहकार्याचा हात पुढे करावा, हे ट्रम्प यांच्या राष्ट्रीय सुरक्षा व्यूहरचना दस्तऐवजात करण्यात आलेल्या आवाहनाचे नवल वाटत नाही.

गेली सुमारे १० वर्षे जगभर घोंघावत असलेले वित्तीय वादळ अंमळ ओसरत असल्याने सुटकेचा निःश्वास टाकणारी वैश्विक अर्थव्यवस्था चीन आणि अमेरिका या दोन महासत्तांच्या दोन व्यूहात्मक कथनांमधून डोकवणा-या पवित्र्यांपायी अनिश्चिततेच्या भोव-यात मोकलली जाईल किंवा कसे, अशी शंका निर्माण होण्यासारखीच ही सगळी परिस्थिती आहे. आर्थिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करत अमेरिकेने देशी भांडवल, देशी कारखानदारी आणि देशी रोजगाराचे संरक्षण करण्याची भूमिका एकीकडे पुरस्कृत करायची आणि देशांतर्गत बाजारपेठा विकसित करून त्यांच्या आधारे भविष्यकालीन आर्थिक विकासाचे संगोपन करणे अवघड असल्याचे ध्यानात आलेल्या चीनने दुसरीकडे मुक्त, खुल्या बाजारपेठीय व्यापारव्यवस्थेची तळी उचलून धरायची या दोन परस्पर विरोधी पवित्र्यांमध्ये वैश्विक अर्थकारणाची कशी घुसमट होते ही सचिंत कुतूहलाची बाब ठरते. ●●

(पृष्ठ २३ वरून)

'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्'च्या क्षेत्रात नोकरी मिळालेल्या उमेदवारांचा, नोकरी मिळाल्यानंतर साधारणपणे सहाएक महिन्यांत, परदेशी ग्राहकांशी अथवा व्यावसायिकांशी कामानिमित्त संपर्क प्रस्थापित होत असतो, असा सर्वसाधारण अनुभव आहे. त्यांमुळे, नोकरी मिळाल्यानंतर लगेच इंग्रजी भाषा सफाईदारपणे बोलणे आणि डौलदार इंग्रजी लिहिता येणे, ही दोन गाभाकौशल्ये 'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्'च्या क्षेत्रात नोकरी मिळवलेल्यांनी आत्मसात करावीत, अशी अपेक्षा असते. त्याच्याच जोडीने संगणकीय प्रणालीवरही त्यांची हुकुमत अपेक्षित असते. याचा अर्थ, अभियांत्रिकीच्या कोणत्याही उपशाखेतील पदवी असलेल्या अभियंत्याचे संगणकीय प्रणाली तयार करण्यावर सणसणीत, ठाम प्रभुत्व असावे, ही अपेक्षा 'सॉफ्टवेअर सर्व्हिसेस्'च्या क्षेत्रात नोकरी देणा-या कंपनीची संबंधित उमेदवारांकडून प्रवेशाच्या पातळीवर नसते. मात्र, तो हाताळत असलेल्या संगणकीय प्रणालीमध्ये काही त्रुटी उद्‌भवल्यास अथवा तिच्यात काही सुधारणा गरजेच्या भासल्यास तेवढे काम त्याला करता यावे, इतकीच कंपनीची प्रारंभीची अपेक्षा असते. परंतु, अभियांत्रिकीसारखे उच्च शिक्षण घेतलेल्या पदवीधरांपाशी तितपत क्षमताही नसतात असे दारूण चित्र हा अहवाल आपल्या पुढ्यात चितारतो.

सॉफ्टवेअरच्या क्षेत्रात एकंदरीनेच स्पर्धा प्रचंड वाढते आहे. त्या स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी आपली उत्पादने व सेवा यांची गुणवत्ता अव्वल राखणे आणि उत्पादनखर्चात बचत साधत राहणे, या दोन बाबी या क्षेत्रातील कंपन्यांना आताशा अनिवार्य होऊन बसलेल्या आहेत. त्यांमुळे, सेवेमध्ये दाखल करून घेतलेल्या उमेदवारांच्या शिक्षण-प्रशिक्षणावर खर्च करण्याबाबत कंपन्या येत्या काळात हात किंचित आखडता घेतील, अशीच संभावना दाट दिसते. ज्या प्रशिक्षित उमेदवारांची मूलभूत गाभाकौशल्ये सरस आहेत आणि विषयज्ञानाचा ज्यांचा पाया पदवीशिक्षणाच्या स्तरावरच पक्का झालेला आहे, अशांनाच कंपन्या यापुढे नोक-यांच्याबाबतीत प्राधान्य देतील, अशीच चिन्हे आहेत. त्यांमुळे, पदवीबरोबरच दर्जेदार कौशल्येही विद्यार्थ्यांना प्रदान करणे हा शिक्षणप्रणालीचा आता गाभा बनवावा लागेल.●●



(पृष्ठ क्रमांक १८ वरून)

उत्पादनवाढीच्या सरासरी वेगाबाबत गोल्डमन सॅक्सने वर्तवलेल्या भाकिताच्या तुलनेत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने विकासदराबाबत वर्तवलेले भविष्य सातत्याने सर्वच स्तरांवर कमी आहे. विकसित देशांच्या पट्ट्यातील उत्पादनवाढ २०१८ साली सरासरीने २.३ टक्क्यांची वास्तव वाढ नोंदवेल, असे गोल्डमन सॅक्सचे म्हणणे, तर; हीच वाढ दोन टक्क्यांची राहील, असे नाणेनिधीचे अनुमान. दोन दरांमधील ही तफावत विकसित देशांच्याबाबतीत तशी फार म्हणता येत नसली तरी, उभरत्या बाजारपेठीय व विकसनशील देशांच्या समूहाबाबतीतील संभाव्य चित्र मात्र तसे नाही. गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार, जगातील उभरत्या बाजारपेठा व विकसनशील देशांच्या समूहातील अर्थव्यवस्था २०१८ सालात सरासरीने ५.६ टक्क्यांची उत्पादनवाढ (वास्तव) नोंदवतील. तर, नाणेनिधीच्या मोजमापानुसार अर्थव्यवस्थांच्या या गटातील वास्तव उत्पादनवाढ २०१८ या वर्षात सरासरीने ४.९ टक्के इतकी असेल. दोन विविध संस्थांनी विकासदराबाबत बांधलेल्या अंदाजांमध्ये पुरेपूर एकवाक्यता असेल, असे गृहीतक मांडणेही बरोबर होणार नाही. परंतु, गोल्डमन सॅक्ससारखी खासगी गुंतवणूक सल्लागार कंपनी काय अथवा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसारखी वैश्विक संस्था काय, या दोन्ही व्यासपीठांच्या अंदाजांनुसार, नजीकच्या भविष्यात तरी वैश्विक अर्थव्यवस्थेच्या पुनरुत्थानामध्ये विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांनाच पुढे होऊन मुख्य धुरा पेलावी लागेल, या एका बाबतीत दोहोंमध्ये मतैक्य दिसते.

चिनी अर्थव्यवस्थेतील उत्पादन २०१८ या वर्षात साडेसहा टक्क्यांची वास्तव वाढ नोंदवेल, या एका बाबीसंदर्भात मात्र गोल्डमन सॅक्स आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या उभयतांमध्ये पूर्ण एकवाक्यता आहे. दोहोंच्या भारताबाबतच्या भाकितामध्ये मात्र अंमळ तफावत दिसतेच. गोल्डमन सॅक्सच्या अंदाजानुसार, २०१८ या वर्षात, भारतीय अर्थव्यवस्था आठ टक्क्यांची वाढ नोंदवेल तर नाणेनिधीच्या गणतीनुसार ही वाढ असेल ७.४ टक्क्यांची.

वास्तवातील चित्र या अंदाजांबरहुकूम खरोखरच उमटेल का, हे आपल्या सगळ्यांना यंदा बघायला मिळेलच ! ●●

*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

गुजरातमधील कौलाचे पडसाद येत्या काळातील धोरणआखणीमध्ये जाणवतील, यात वादच नाही. मुळात, २०१९ मध्ये सार्वत्रिक निवडणुका असल्यामुळे २०१८-१९ या वित्तीय वर्षासाठीचा अर्थसंकल्प अर्थशास्त्रीय काटेकोरपणापेक्षाही राजकीय सोयी-सोयरिकीच्या भावनेने भारित असेल, हे सांगण्याची गरजच नाही. गेली सुमारे अडीच दशके शेतीसह एकंदरच ग्रामीण अर्थकारण अ-लक्षित राहिलेले आहे, हे कोणीच नाकारणार नाही. तो सगळा अनुशेष केवळ एक ते दीड वर्षाच्या कालावधीत भरून येईल, हेही अशक्यच. तरीही, ग्रामीण भारताची उपेक्षा होत असल्याची जी भावना अनेक स्तरांत मूळ धरते आहे तिला चुचकारण्यासाठी काही ना काही सरकारला करावेच लागेल. या सगळ्याचा ताण सरकारी तिजोरीवर आणि पर्यायाने वित्तीय तुटीवर येईल, हे तर उघडच आहे. मग, पतधोरणापासून सगळ्यांच समीकरणांची फेरमांडणी करणे अनिवार्य होऊन बसेल. भारतीय अर्थव्यवस्थेचे हितसंपादन आणि राजकीय हितसंबंधांची जुळणी-जुळवणी एकाच वेळी करण्याची कसरत सरकार कशी करणार आहे, हे मोठे प्रश्नचिन्ह सगळ्यांच्याच पुढ्यात आहे. ●●

---

**प्रमुख संदर्भ**

**(A) पुस्तके :-**

(1) Planning Commission Reports on Labour and Employment : Academic Foundation, Economica India Info-Service, Darya Ganj, New Delhi, 110002, 2002.

**(B) Websites :-**

(1) www.whitehouse.gov/wp-content/uploads/2017/12/NSS-Final-12-18-2017-0905.pdf.

(2) www.goldmansachs.com/our-thinking/pages1.../2018...good-as-it-gets/report.pdf.

(3) www.imf.org/en/Publications/WEO/Issues/2017/09/19/~media/Files/.../c1.ashx.

●●



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **२०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **३५०/ - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **५००/ - रुपये** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **८०० /- रुपये** |

# *ग्रंथालयातील पुस्तके*

## ● MONEY CHANGES EVERYTHING

**HOW FINANCE MADE CIVILIZATION POSSIBLE**

**William Goetzmann, Princeton University Press, New Jersey, 2016, Pages - XX+ 584, Price - Rs. 2334/-.**

आपल्या अस्तित्त्वाची चुणूक आणि जाणीव या ना त्या स्वरूपात जगभरातील विविध देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये करून देत असलेल्या वित्तीय अरिष्टाची दशकपूर्ती येत्या १४ सप्टेंबर २०१८ रोजी होईल. अमेरिकी अर्थव्यवस्थेसह उभ्या जगाच्याच अर्थकारणाची वीण विसविशीत करणा-या या वित्तीय अरिष्टाचा उगम अमेरिकी बँकिंग व्यवसायात घडून आल्याने उभ्या वित्तीय क्षेत्राकडेच गेली दहा वर्षे आपण सगळेजण संशयानेच बघत आलो. देशोदेशींच्या अर्थकारणांत विलक्षण मोलाची भूमिका बजावणारे शेअर बाजार, बँका, म्युच्युअल फंड...यांसारख्या वित्तसंस्था या जणू काही खलनायक असाव्यात, अशाच प्रकारची भावना जागतिक समुदायाच्या सबोध-अबोध मनामध्ये गेल्या संपूर्ण दशकभरादरम्यान व्यक्ताव्यक्तपणे नांदत आली. पैसा आणि त्याच्या आधारे गतिमान होणारी उभी वित्तव्यवस्था यांनी मानवी जीवनव्यवहारांतच केवळ नव्हे तर, यच्चयावत मानवी संस्कृतीच्या आजवरच्या विकासातच किती बहुमिती, मोलाची आणि मध्यवर्ती भूमिका बजावलेली आहे, या वास्तवाचा, त्या सगळ्यांमुळे, आपल्याला जणू काही विसरच पडलेला होता आणि आहे. मानवी संस्कृतीच्या प्रदीर्घ अशा विकासोपक्रमामध्ये, स्थित्यंतराच्या प्रत्येक टप्प्यावर पैसा आणि वित्तव्यवस्था या दोन घटकांनी किती व कशी कळीची कामगिरी पार पाडलेली आहे, याचा विलक्षण उद्‌बोधक, वाचनीय, रंजक तितकाच विश्लेषक आलेख सादर करणारा हा ग्रंथ केवळ अर्थशास्त्राच्याच नव्हे तर कोणत्याही विद्याशाखेच्या जिज्ञासू अभ्यासकास खिळवून ठेवेल. ●●



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2016-2018**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ● 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ● भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ● अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ● इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ● संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

● संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

● अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

● विकास चित्रे ● किशोर चौकर ● सुरिंदर जोधका ● रमानाथ झा
● अभय टिळक ● रवींद्र ढोलकिया ● ललित देशपांडे ● दिलीप नाचणे
● सुहास पळशीकर ● मनोहर भिडे ● नीळकंठ रथ ● रूपा रेगे-नित्सुरे
● एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**